**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
(लेखा शाखा)
ई-मेल:- dcg.aurangabad@gmail.com दूरध्वनी क्र 0240-2351311

---

जा.क्र.२०२५/साप्र/लेखा-४/सी.सी.टी.व्ही. द.प्र. /प्र.क्र दिनांक : २४/०९/२०२५.

**दरपत्रक /निविदा**

**विभागीय आयुक्त कार्यालयातील CCTV यंत्रणा व बायोमट्रीक मशीनची देखभाल व दुरुस्ती करीता दरपत्रके मागविण्याबाबत.**

विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर कार्यालयाच्या CCTV यंत्रणा व बायोमट्रीक मशीनची देखभाल व दुरुस्ती करीता दिनांक-१५/०८/२०२५ ते १४/०८/२०२६ या कालावधीकरीता किंवा पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष या कालावधीकरिता सेवा पुरवठादार यांच्याकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे. दरपत्रकाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | दरपत्रक /निविदा शुल्क (ना परतावा रक्कम) | दरपत्रक /निविदा दाखल करण्या-या कडुन सुरक्षा रक्कम | निविदा मंजुर झालेल्या निविदाधारकाने ठेवावयाची अनामत रक्कम | कामाचा कलावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १ | CCTV यंत्रणा व बायोमेट्रीक मशीनची दुरुस्ती व देखभाल | ६००/- | ३०००/- | निविदा रक्कमेचा वार्षिक किंमतीच्या ३% | (१२ महिने) १ वर्ष |

१. सदर दरपत्रकाचे सुचनापत्र, दरपत्रक दाखल करण्याचे वेळापत्रक व अन्य कागदपत्रे इत्यादीची माहिती https://Aurangabad.gov.in/en/commissioner-office/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच निविदा / दरपत्रकाबाबत यापुढील सुचना / शुध्दीपत्रके या कार्यालयाचे नोटिस बोर्डवर किंवा उक्त संकेतस्थळावर उपलब्ध होतील.
२. दर पत्रकाची किंमत रु.६००/- राहील, एका सेवापुरवठादारास फक्त एकच दरपत्रक मिळेल.
३. दरपत्रके दिनांक २४/०९/२०२५ ते ७/१०/२०२५ या कालावधीमध्ये (सर्व सुटीचे दिवस वगळुन) कार्यालयीन वेळेत लेखाधिकारी लेखा शाखा (सामान्य प्रशासन ) विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे रु.६००/- रोख नापरतावा शुल्क भरुन मिळतील. निविदा / दरपत्रक दाखल करणा-याने भरावयाची सुरक्षा रक्कम रु.३०००/- रोख भरणे आवश्यक असून सदर रक्कमेचा परतावा निविदा / दरपत्रक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करण्यात येईल.
४. भरलेली सीलबंद दरपत्रके दिनांक २४/०९/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपासुन ते ७/१०/२०२५ रोजी सायंकाळ ०५.०० वाजेपर्यंत या कालावधी मध्ये (सर्व सुटीचे दिवस वगळुन) दरपत्रके

---

टाकण्यासाठी (दरपत्रकाचा तांत्रिक लिफाफा व दरपत्रकाचा व्यापारी लिफाफा ) सीलबंद पेटीमध्ये टाकता येतील व तांत्रिक लिफाफा दिनांक ८/१०/२०२५ रोजी शक्य झाल्यास दुपारी ३.०० वाजता किंवा शक्य न झाल्यास दुस-या दिवशी (कार्यालयीन कामकाजाच्या) उपस्थित पुरवठादारासमक्ष (उपस्थित असल्यास) उघडण्यात येतील. तदनंतर तांत्रिक लिफाफ्यात नमुद कागदपत्रांची पुर्तता करण्या-या पात्र सेवापुरवठादारांचाच व्यापारी लिफाफा हा तांत्रिक लिफफ्याची तपासणी पुर्ण झाल्यावर किंवा दिनांक ९/१०/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता किंवा शक्य न झाल्यास दुस-या दिवशी (कार्यालयीन कामकाजाच्या) उपस्थित पुरवठादारासमक्ष (उपस्थित असल्यास) उघडण्यात येतील.

५. दरपत्रकाचा तांत्रिक लिफाफ्यात व दरपत्रकाचा व्यापारी लिफाफा अशा दोन लिफाफ्यात माहिती सादर करावयाची आहे.

६. CCTV यंत्रणा व बायोमेट्रीक मशीनची देखभाल दुरुस्तीची दरपत्रके दाखल करतांना कार्यालयीन परिसर व कार्यालयात बसविण्यात आलेल्या CCTV यंत्रणेची व बायोमॅट्रीक मशीनची पाहणी करून दर नमूद करावेत.

७. लिफाफा क्र.१-<u>**तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.**</u>

१. दरपत्रकधारकाची / निविदाधारकाची माहितीबाबतचे विवरण पत्र
२. दुकाने व संस्था अधिनियम 1947 अन्वये शॉप ॲक्ट लाइसन्स / संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची अद्यावत प्रमाणपत्राची छायांकित प्रत.
३. आधार कार्डची छायांकित प्रत.
४. पॅन कार्डची छायांकित प्रत
५. GST वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्राची (Certificate of Registration) छायांकित प्रत
६. असल्यास मागील दोन वर्षाचे आयकर विवरणपत्राची प्रत.
७. असल्यास शेवटच्या तिमाहीचे विवरणपत्र (GST Return) छायांकित प्रत
८. सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबात व काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे, अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र व साहित्याच्या उच्च गुणवत्ता व मुदतीत पुरवठा करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र निविदा / दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र
९. असल्यास मागील तीन वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र.
१०. दरपत्रक / निविदा दाखल करणा-या कडुन भरावयाची सुरक्षा रक्कम रु. ३०००/- भरलेले पावतीची प्रत

उपरोक्त अनुक्रमांक १ ते १० ही सर्व कागदपत्रे स्वयंसाक्षांकित ( self attested ) करुन तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सर्व परवान्यांचे दरपत्रकाच्या कालावधीपर्यंत नुतनीकरण असणे आवश्यक राहील. तसेच वरीलपैकी सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती दरपत्रक उघडतेवेळी सोबत ठेवणे व कोणत्याही कागदपत्राच्या मुळ प्रतीची मागणी या कार्यालयाकडून कोणत्याही वेळी करण्यात आल्यास त्या सादर करणे बंधनकारक राहील.

८. व्यापारी लिफाफा क्र.२ व्यापारी लिफाफ्यामध्ये मुळ दरपत्रकातील परिशिष्ठ अ मध्ये देखभाल दुरुस्तीचा माहेवारी व वार्षिक रक्कम भरणे व परिशिष्ठ ब मध्ये साहित्याचा प्रती नग नमूद करुन सिलबंद करुन सादर करणे आवश्यक आहे

९. **निविदा / दरपत्रकाबाबत आवश्यक अटी व शर्ती**

१. एक निविदाधारक /दरपत्रकधारक यांनी एकच निविदा/दरपत्रक भरणे आवश्यक असून त्यांना एकापेक्षा अधिक निविदा/दरपत्रके वेगवेगळया नावांने सादर करण्यास प्रतिबंध आहे.

२. विहीत मुदतीनंतर प्राप्त निविदा / दरपत्रके स्विकारली जाणार नाही अथवा त्यावर विचार केला जाणार नाही.

३. परिशिष्ठ ब मधील साहित्याबाबत मुळ दरपत्रकात बाबनिहाय दरात जीएसटीसह मुल्यवर्धीत कर आयकर व इतर वेळोवेळी शासन निर्णयानुसार प्रकाशित होणारे कर आणि वाहतुक खर्च समाविष्ठ असणे बंधनकारक आहे.

४. दरपत्रकात दर्शविलेल्या सर्व बाबीचे दर नमुद करणे दरपत्रकधारकास बंधनकारक राहील.

५. निविदा / दरपत्रकाचा तांत्रिक लिफाफा सुरवातीस उघडण्यात येईल. तपासणी अंती तांत्रिक लिफाफ्यात आवश्यक असणा-या नमुद कागदपत्रांची पुर्तता करण्या-या पात्र निविदाधारकांची पुढिल निविदा प्रक्रियेसाठी विचार करण्यात येईल. व तांत्रिक लिफाफात पात्र निविदा/ दरपत्रधारकांचाच व्यापारी लिफाफा उघडण्यात येईल.

६. या अटी व शर्ती तसेच निविदा मंजुर झाल्यानंतर निविदाधारक / दरपत्रक धारक यांनी करारनामा करुन देण्याच्या अटी व शर्ती या निविदाधारक / दरपत्रक धारकास बंधनकारक राहतील, दरपत्रक मंजूर झाल्यानंतर सर्वसाधारण मंजुर निविदा रक्कमेचा वार्षिक किंमतीच्या ३% इतक्या रकमेचा एवढी रक्कमेचा एफडीआर सुरक्षा ठेव म्हणून ठेवावी लागेल

७. या सर्व अटी व शर्ती मध्ये नवीन अटी व शर्तीचा समावेश करणे, अटी व शर्ती कमी करणे तसेच परिस्थितीनुसार त्यामध्ये वदल करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त कार्यालय यांनी राखून ठेवले आहे.

८. व्यापारी लिफाफ्यात परिशिष्ठ अ व ब बाबनिहाय सर्वात कमी कमी न्युनतम दर (L-1) ज्या निविदा / दरपत्रकधारकांचा असेल त्या त्या निविदा / दरपत्रकधारकास त्याबाबीचा पुरवठा आदेश देण्यात येईल. तसेच न्युनतम दर (L-1) हे एकापेक्षा जास्त सेवापुरवठादार यांचे असल्यास त्यांना वाटाघाटीसाठी बोलाविण्यात येवून त्यानुसार निर्णय अंतिम करण्यात येईल.

९. CCTV कॅमेरा व बायोमॅट्रीक मशीनच्या देखभाल दुरुस्ती व त्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्याचा पुरवठा केल्यानंतर त्याबाबतचे देयक व्दिप्रतीत सादर करणे बंधनकारक राहील कार्यालयीन आर्थिक तरतुद उपलब्ध राहील, त्याप्रमाणे देयके मंजूर करुन प्रदान करण्यात येईल त्यासाठी कोणत्याही प्रकारचा अग्रिम दिला जाणर नाही तसेच व्याज दिले जाणार नाही.

१०. कोणतेही दरपत्रक/निविदा, दरपत्रक/निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचा व रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाने राहून ठेवला आहे.

११. ज्या दरपत्रकधारकाच्या दर अंतिम झाल्यानंतर त्यांना सोबतच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा रु.५००/- च्या बॉडवर १५ दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
**(लेखा शाखा)**

ई-मेल:- dcg.aurangabad@gmail.com दूरध्वनी क्र 0240-2351311

---

१२. परिशिष्ठ ब मध्ये नमुद CCTV यंत्रणा व देखभाल दुरुस्तीकरीता लागणा-या साहित्याचे अदा करण्यात येणा-या रक्कमेवरील नियमानुसार आयकर रक्कम व GST इतर अनुषंगिक कर कपात करण्यात येतील.

१३. सदर निविदेचा कालावधी.एक वर्षाचा राहिल.

१४.अटीं व शर्तीची पुर्तता करणेची जबाबदारी संबंधित दरपत्रकदाराची असून कोणत्याही अटीचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम सरकार जमा करणेत येईल.

१५. दरपत्रके भरण्याबाबत प्रतिज्ञापत्र, स्वयंघोषणापत्र, अटी व शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिज्ञापत्र व दरपत्रकदार यांची माहिती याबाबतचा नमुना सोबत संलग्न केलेले आहे.

**१० .संक्षिप्तरित्या दरपत्रकाचे वेळापत्रक खालीप्रमाणे आहे.**

| अ.क्र | बाब | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | दरपत्रक विक्री | दिनांक- २४/०९/२०२५ ते ७/१०/२०२५ | कामकाजाच्या दिवशी (सुट्टीचे दिवस वगळुन) सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत |
| २ | दरपत्रक दाखल करणे | दिनांक- २४/०९/२०२५ ते ७/१०/२०२५ | कामकाजाच्या दिवशी (सुट्टीचे दिवस वगळुन) सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत |
| ३ | तांत्रिक लिफाफ्याची पेटी व लिफाफा उघडणे | दिनांक -८/१०/२०२५ | दुपारी ३.०० वाजता (शक्य झाल्यास) किंवा दुसऱ्या रोजी कार्यालयीन वेळेत |
| ४ | व्यापारी लिफाफ्याची पेटी व लिफाफा उघडणे | दिनांक- ९/१०/२०२५ किंवा तांत्रिक लिफाफा उघडण्याची प्रक्रिया पूर्ण होताच दुसऱ्या दिवशी | दुपारी ३.०० वाजता (शक्य झाल्यास) किंवा तांत्रिक लिफाफा उघडण्याची प्रक्रिया पूर्ण होताच दुसऱ्या दिवशी |

महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
(लेखा शाखा)
ई-मेल:- dcg.aurangabad@gmail.com दूरध्वनी क्र 0240-2351311

---

खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार हमीपत्र आस्थापनेच्या /संस्थेच्या लेटरहेडवर देण्यात यावे.

**एकच दरपत्रक सादर करत असलेबाबत, निविदाधारकांचे कंपनीस /संस्थेस यांनी काळया यादीत टाकलेले नाही, कागदपत्रांच्या सत्यतेबाबत, ई-निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत**

**प्रतिज्ञापत्र / हमीपत्र**

विभागीय आयुक्त कार्यालयात सी.सी.टी.व्ही. व कॅमेरा देखभाल दुरुस्तीकरीता मी दरपत्रक दाखल करीत असून खालील प्रमाणे हमी देत आहे.

मी एकापेक्षा अधिक संस्थेचा मालक/संचालक/भागीदार/बहुसंख्य भागधारक नाही, असल्यास मी ज्या संस्थेचा मालक/संचालक/भागीदार/बहुसंख्य भागधारक आहे त्यासंस्थेपैकी एकाच संस्थेमार्फत मी एकच दरपत्रक सादर करीत आहे.

तसेच माझ्या कंपनीस/संस्थेस राज्य तसेच केंद्र शासकीय/निमशासकीय/ पुरवठादारांच्या काळया यादीत टाकलेले नाही असे मी प्रमाणित करीत आहे.

मला पूर्ण कल्पना आहे की, मी सादर केलेले दरपत्रक मंजूर झाल्यास कार्यालयाकरीता सी.सी.टी.व्ही व कॅमेराबाबत तत्सम साहित्य उच्च गणुवत्तेने व दिलेल्या मुदतीत निर्देशित केलेल्या वेळेत विहीत ठिकाणी पुरवठा करेन व या कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ साधन सामग्री उपलब्ध ठेवेल मला याबाबत पुर्ण कल्पना आहे की, मी माझ्या कामात कोणत्याही प्रकारची कसूर /दिरंगाई अथवा हजलगर्जीपणा झाल्यास विभागीय आयुक्त कार्यालय निश्चित करतील अशा दंडास अथवा कायदेशिर शिक्षेस मी पात्र राहीन. माझे फर्मने उक्त निविदेच्या अनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे व माहिती खोटी आढळल्यास भा.द.वि.कलम १९९, २०० अन्वये मी शिक्षेस पात्र राहील. तसेच मी सादर केलेली निविदा अवैध ठरेल याची मला जाणीव आहे.

मी दरपत्रकातील अटी व शर्ती पुर्णपणे वाचलेल्या आहेत. सदर अटी व शर्ती मला मान्य असून त्यांच्या अधिन राहून मी सदर दरपत्रक सादर करीत आहे.

वरील सर्व माहिती खरी व सत्य असून यामध्ये काही असत्यता आढळून आल्यास माझी कंपनी/संस्था दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहीन हे मला मान्य आहे.

स्थळ : निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का

दिनांक :

नाव : -------------------------------

पत्ता : ------------------------------

------------------------------.

भ्रमणध्वनी क्र. ----------------------

महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
(लेखा शाखा)
ई-मेल:- [illegible]@gmail.com दूरध्वनी क्र [illegible]

---

**विभागीय आयुक्त कार्यालयाकरीता CCTV कॅमेरा व बायोमेट्रीक मशीनची दुरुस्ती व देखभालकरीता निविदा / दरपत्रकधारकाची माहिती बाबतचे विवरण**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | निविदा /दरपत्रकधारकाचे आस्थापना / संस्थेचे नाव व पत्ता | |
| २. | निविदा /दरपत्रकधारका चे पूर्ण नाव व ह. रहिवासी पत्ता | |
| ३. | आस्थापना पूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक मोबाईल् क्रमांक व ईमेल | |
| ४ | शॉपॲक्ट लायसन्स/ आस्थापना/ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र | |
| ५. | आधारकार्ड क्रमांक (छायांकित प्रत सोबत जोडणे) | |
| ६. | पॅन कार्ड क्रमांक (छायांकित प्रत सोबत जोडणे) | |
| ७. | GST वस्तू व सेवा कर नोंदणी क्रमांक प्रमाणपत्राची (Certificate of Registration) छायांकित प्रत | |
| ८. | मागील दोन वर्षाचे आयकर विवरणपत्र प्रत | |
| ९. | शेवटचे तिमाहीच्या GST अदायगीचे विवरण प्रत | |
| १०. | सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबात व काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र, अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र व साहित्याच्या उच्च गुणवत्ता व मुदतीत पुरवठा करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र निविदा / दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र | |
| ११. | मागील तीन वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र | |
| १२ | सुरक्षा रक्कम भरल्याची पावतीची प्रत | |

स्थळ

निविदा / दरपत्रकधारकाची सही व शिक्का

दिनांक-

**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
(लेखा शाखा)
ई-मेल:- dcg.aurangabad@gmail.com **दूरध्वनी क्र** 0240-2351311

---

**<u>दरपत्रक अंतिम झाल्यानंतर सेवापुरवठादार यांनी करारनामा करुन दयावयाच्या अटी व शर्ती</u>**

१) CCTV यंत्रणा व बायोमेट्रीक मशीनची देखभाल दुरुस्तीची कामे ही सेवा पुरविण्यासाठीचे दर हे दिनांक १५/०८/२०२५ ते १४/०८/२०२६ या कालावधीसाठी अंमलात राहतील. शक्य झाल्यास सदर कराराला शासन नियमानुसार मुदत वाढ देणे आवश्यक असल्यास मुदत वाढ देण्यात येईल व मुदतवाढ कालावधीमध्ये स्वीकृत झालेल्या दरानेच अदायगी केली जाईल. सदरची मुदतवाढ स्वीकृत दराने स्वीकारणे हे सेवापुरवठादार यांच्यावर बंधनकारक राहील.

(२) CCTV यंत्रणेअंतर्गत बसविण्यात आलेल्या साहित्याची यादी परिशिष्ठ 'ब' मध्ये दर्शविण्यात आली आहे. सदरील साहित्य नैसर्गिक आपत्ती/अथवा शॉर्टसर्किट इत्यादी कारणांमुळे खराब किंवा नादुरुस्त झाल्यास कार्यालयाकडून खरेदी करण्यात येईल.

(३) सदरील दरकरार हा CCTV यंत्रणा व बायोमेट्रीक मशीनची देखभाल दुरुस्तीसाठी असून यामध्ये लागणा-या साहित्याचा समावेश राहणार नाही. CCTV यंत्रणेअंतर्गत बसविण्यात आलेल्या साहित्याची यादी परिशिष्ठ 'ब' मध्ये दर्शविण्यात आलेल्या साहित्याचे प्रतिनग दर हे दरकरार कालावधीसाठी लागू राहतील व नमूद केलेल्या दरांचे सदर साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

(४) विभागीय आयुक्त कार्यालय हे विभागीय स्तरावरील असल्यामुळे या कार्यालयात विभागातील नागरिक, कर्मचारी, अधिकारी, राजकीय पक्षांचे मोर्चे, निदर्शने, मा. मंत्री महोदय व वरिष्ठ अधिकारी यांच्या बैठका आदी नियमित होत असल्याने CCTV यंत्रणा नेहमी कार्यान्वित राहणे आवश्यक राहील.

(५) CCTV यंत्रणेत काही बिघाड झाल्यास त्याची सूचना आपणास दूरध्वनीद्वारे देण्यात येईल. सूचना प्राप्त होताच २४ तासाचे आत दुरुस्ती करणे बंधकारक राहील.

(६) जर CCTV यंत्रणेच्या दुरुस्ती/देखभालची कामे वेळेत केली जात नसेल, कामात चालढकल करत असेल, अथवा समाधानकारक काम करत नसेल तर हे कार्यालय कोणतीही पूर्वसूचना न देता करार रद्द करण्यात येऊन सुरक्षा अनामत रक्कम व प्रलंबित देय देयकाची सर्व रक्कम जप्त करण्यात येईल,

(७) CCTV यंत्रणेची तपासणी दर पंधरा दिवसाने करून त्याबाबतचे अहवाल लेखी स्वरूपात नायब तहसीलदार (सामान्य प्रशासन )यांना सादर करणे बंधनकारक राहील.

(८) कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७०, महाराष्ट्र कंत्राटी नियम १९७१, व इतर सर्व कामगार/औद्योगिक कायद्याचे पालन करण्याची व त्यानुसार आवश्यक ते अभिलेखे विहित नमुन्यात ठेवण्याची व विवरणपत्रे इत्यादीबाबत वेळेचे वेळी पूर्तता करण्याची जबाबदारी सेवापुरवठादार यांची राहील

(९) कार्यालयातील किंवा कार्यालयीन परिसरातील कोणत्याही सामानाची चोरी, लपवालपवी होणार नाही हे पाहणे सेवापुरवठादार यांची जबाबदारी राहील व असे काही झाल्यास याची सर्व जबाबदारी सेवापुरवठादार यांची राहील.

(१०) निविदाधारकाने नियुक्त केलेल्या कामगार/कर्मचारी यांचेकडून गैरवर्तन अथवा कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास सेवापुरवठादार यांचेकडून नुकसान भरपाई घेण्यात येईल.

(११) CCTV यंत्रणा व बायोमेट्रीक मशीनची देखभाल व दुरुस्ती देयक नायब तहसीलदार (सा.प्र) यांचे काम समाधानकारक केल्याबाबतच्या अभिप्रायासह प्रतीमहा देयक अभिलेखपालामार्फत लेखा शाखेत प्रत्येक तिमाही संपल्यावर ५ तारखेपूर्वी सादर करावे लागेल. कार्यालयीन आर्थिक तरतुद उपलब्ध राहील त्याप्रमाणे देयके मंजूर करून प्रदान करण्यात येईल.

(१२) परिशिष्ठ ब मध्ये नमुद CCTV यंत्रणा व देखभाल दुरुस्तीकरीता लागणा-या साहित्याचे अदा करण्यात येणा-या रक्कमेवरील नियमानुसार आयकर रक्कम व GST इतर अनुषंगिक कर कपात करण्यात येतील.

**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
(लेखा शाखा)
ई-मेल:- dcg.aurangabad@gmail.com दूरध्वनी क्र 0240-2351311

---

(१३) दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.५०० च्या बॉन्डवर करारपत्र आदेश दिल्यापासुन १५ दिवसात या कार्यालयास सादर करणे तसेच मंजुर निविदेच्या रक्कमेच्या ३% एवढी रक्कमेचा एफडीआर सुरक्षा ठेव म्हणून १५ दिवसाच्या आत कार्यालयात जमा करावा लागेल. कराराची मुळ मुदत/वाढलेली मुदत संपल्यानंतर हि रक्कम सेवापुरवठादार त्यांच्याकडून कार्यालयाचे नुकसान झाल्यास तेवढी रक्कम वजा करून परत करण्यात येईल.

(१४) सदरील दरकरार कराराच्या कालावधीमध्ये कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहे. कोणतीही नोटीस न देता करारनामा रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही उजर चालणार नाही.

(१५) निविदा मंजुर झालेल्या निविदाधारक / दरपत्रकधारकाने या कार्यालयास सादर केलली कागदपत्र कोणत्याही टप्प्यावर खरी नसल्याचे आढळुन आल्यास निविदा/ दरकरार रद्द करण्यात येईल व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल याबाबत कोणतीही उजर चालणार नाही.

(१६) देयकाबाबत कार्यालयाच्या विरोधात उपोषण / आत्मदहन करण्याचा अधिकार रहणार नाही. उपोषण / आत्मदहन केल्यास संबंधित कार्यालय / शासन जबाबदार राहणार नाही यांची दरपत्रकधारकाने नोंद घ्यावी.

(१७) कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्भवल्यास विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

(१८) वरील सर्व अटी व शर्ती मध्ये नवीन अटी व शर्तींचा समावेश करणे, अटी व शर्ती कमी करणे तसेच परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांनी राखून ठेवले आहे.

(१९) न्यायालयीन कामकाजासाठी कार्यक्षेत्र हे छत्रपती संभाजीनगर राहील.